Impact Factor-8.632 (SJIF)

ISSN 2278-9308

Issue No (CDLXVI) 471

Volume-B

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March 2024

## Cooperative Sector in India: Opportunities and Challenges




**Chief Editor**

**Prof. Virag S. Gawande**

Director

Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

B.Aadhar

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B
ISSN : 2278-9308
March 2024

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
| --- | --- | --- |
| 1 | Co-Opertaive Movement In India<br>**Mr. Kolekar G.K. , Prof. Dr. S.M. Kolhe** | 1 |
| 2 | The Co-Operative Banking Sector developments In India And Challenges<br>**Dr.Narayan Vinod Kadubal** | 4 |
| 3 | Human Resource Development: Challenges before Cooperative Dairy Business Management in Maharashtra<br>**Dr. Sambhaji V. Mane** | 8 |
| 4 | Performance of PMFBY in Mrathwada Region<br>**Asst. Prof. Dr. Vishnukant Shelke** | 13 |
| 5 | Performance of Deogiri Nagari Sahakari Bank Ltd. Chhatrapati Sambhajinagar<br>**Dr. Rajendra . L. Kable** | 17 |
| 6 | Co-Operative Collection Development Of A Library<br>**Dr. Sarkale Anant B.** | 22 |
| 7 | A study of benefits and challenges faced by Co-operative Banks in India<br>**Dr. Laxmikant Nandkishor Soni** | 27 |
| 8 | Women empowerment through Co-operative institutions<br>**Arti Atmaram Waghmare , Dr. Pradeep D. Shelke** | 31 |
| 9 | Urban Cooperative Banks: Helping Hand for Small Economic Activities<br>**Dr.Baswaraj B. Lakshete** | 34 |
| 10 | Opportunities and Challenges before Cooperative Banks in India<br>**Rindakwale Ajay Balaji ,Dr. N. H. Awade** | 39 |
| 11 | Role of Co-operation in Rural Development **Dr. Pradeep D. Shelke** | 43 |
| 12 | A Study of the Financial Performance and Problemsof Selected Non-Scheduled Urban Co-Operative Banks with Special Preference To Pune District<br>**Vaibhav Suryawanshi** | 46 |
| 13 | Role of Cooperation in Economic Development in India<br>**Mr. Narendra Ramakant Chole , Dr. P. D Shelke** | 54 |
| 14 | भारतातील सहकारी बँकिंगक्षेत्राची रचना डॉ. मारुती बाबुराव कातकडे | 58 |
| 15 | प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था:कार्य, समस्या आणि उपाय<br>प्रोफेसर डॉ. मारोती कच्छवे | 62 |
| 16 | महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय : प्रगती, समस्या व उपाययोजना.<br>डॉ. प्रोफेसर काळे बी. एम. | 69 |
| 17 | महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राची भूमिका प्रा. डॉ. टी, एम. गुरुनुले | 73 |
| 18 | भारतातील सहकारी आंदोलनाचा इतिहास डॉ.मोहन मिसाळ | 76 |
| 19 | कृपीधान्य साठवणुकीच्या सहकारी गोदामासमोरील संधी आणि आव्हाने<br>डॉ.डी.बी. कोनाळे , राहुल व्यंकटराव | 79 |
| 20 | सहकारी कायदे व नियम डॉ.सदानंद राजाराम वडजे | 83 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B
ISSN : 2278-9308
March 2024

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था:कार्य, समस्या आणि उपाय

प्रोफेसर डॉ. मारोती कच्छवे
संशोधन मार्गदर्शक व वाणिज्य विभाग प्रमुख,कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,सोनपेठ जिल्हा परभणी.

गोषवारा (Abstract) :-

भारत देश शेतीप्रधान देश आहे.पूर्वीपासून शेतकरी व ग्रामीण जनता कर्जाच्या कचाट्यात सापडलेली आहे. पुरातन काळापासून भारतात राजेशाही असल्यामुळे ग्रामीण भागात कर्ज पुरवठा करण्याचा एकमेव स्त्रोत सावकार व सराफी पिढी वाले होते .राज्यशाहीत सावकारांना राजमान्यता होती. त्यामुळे कर्जाचे प्रमुख व्यवहार सावकार करीत असत. सावकार ग्रामीण जनतेला जास्त व्याजदराने कर्ज देऊन त्यांना लुबाडीत होते. शेतकऱ्यांना कर्जासाठी जामीन देण्यासाठी शेती शिवाय दुसरे साधन नव्हते म्हणून सावकार आणि जमिनीच्या कारणावर मोठ्या प्रमाणावर कर्ज दिले होते त्यामुळे ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यात वाढ होऊन त्यांचा कर्जबाजारीपणाही वाढत होता .1904 च्या सहकारी संस्था कायद्याने भारतात चळवळीचा पाया घातला. शेतकऱ्यांचे हिताचे रक्षण करावे, लोकांना काटकसर व बचत करण्याची सवय लागावी, एकमेकांना मदत व परस्पर सहकार्यात वाढ करणे आणि ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी करणे, सावकाराच्या मगर मिठीतून ग्रामीण शेतकऱ्यांची सुटका करणे इत्यादी हेतू सहकारी चळवळीच्या पाठीमागे होते. 1904 च्या कायद्यानुसार अनेक सहकारी पतसंस्था स्थापन झाल्या आणि त्यांनी लक्षणीय प्रगती देखील केलेली आहे. कर्जबाजारीपणामुळे प्राथमिक सहकारी पतसंस्थाचे अस्तित्व धोक्यात आले. त्याचप्रमाणे जिल्हा आणि राज्यपातळीवरील सहकारी संस्थांचे अस्तित्व धोक्यात आले .ग्रामीण कर्जांनी कर्जबाजारीपणा याची सखोल पुनर्विलोकन करण्यासाठी 1945 मध्ये डॉ धनंजय राव गाडगीळ यांच्या अध्यक्ष खाली एक समिती नियुक्त करण्यात आली.समितीने ग्रामीण कर्ज पुरवठ्याचे विश्लेषण करून सावकारांना पर्यायी ठरू शकते आणि शेतकऱ्यांची शेती कर्जाची गरज पुरेशा प्रमाणात आणि वाजवी अटीवर पूर्ण करू शकेल अशी संस्था स्थापन करण्याची शिफारस केली.

• प्रस्तावना (Introduction):-

स्वातंत्र्यानंतरच्या काळात अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणीगोरवाला समितीची भारतीय रिझर्व बँकेने केलेली स्थापना ही भारताच्या सहकारी चळवळीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते .1954 च्या अखिल भारतीय ग्रामीण पत पाहणी समितीने सहकारी संस्थांची रचना बदलण्याची देखील शिफारस केली आहे.तसेच 1959 मध्ये वैकुंठ लाल मेहता यांचे अध्यक्षतेखाली सहकारी पतपुरवठ्याची पुनर पाहणी करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली.या समितीने खेडे हा पाया म्हणून सहकारी संस्थांचे संघटन करावे अशी शिफारस केली .सहकारी संस्था टिकाऊ स्वरूपाची व्हावी म्हणून एका खेड्यासाठी एक सहकारी पतसंस्था स्थापन न करता तिचे कार्यक्षेत्र अनेक खेडे यासाठी विस्तृत करण्यात यावे आणि ते पाच हजार लोकसंख्या आणि तीन ते चार चौरस मैलाच्या प्रदेशासाठी असावे.अल्प व मध्यम कालीन सहकारी पतपुरवठ्याची जी त्रीसत्रिय रचना आहे.त्या रचनेत सर्वात खालच्या स्तरावर कार्यरत असणारी संस्था म्हणजे सहकारी प्राथमिक पतसंस्था होय.प्राथमिक पतपुरवठा संस्था प्रामुख्याने सहकारी पतरचनेत तळाशी असल्यामुळे या संस्थेला सहकारी पतरचनेचा पाया म्हटले जाते.प्राथमिक संस्थांची स्थापना ही ग्रामीण भागातील शेतकरी स्वच्छेने एकत्र येऊन करीत असतो. त्यामुळे या संस्थांचा शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संबंध येतो. शेती व्यवसायासाठी अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा करणे आणि विशेषतः कृषी उत्पादन वाढीसाठी बी बियाणे खते व जंतुनाशके शेतीची अवजारे इत्यादीचा पुरवठा करणे. हा या संस्थांचा मुख्य उद्देश असतो .तसेच सभासदांना बचतीची

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B

ISSN : 2278-9308
March 2024

सवय लावणे, ठेवी गोळा करणे, शेतमाल संग्रहणाच्या सोयी देणे, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे आणि सभासदांच्या आर्थिक कल्याणाच्या योजना आखणे इत्यादी बाबीकडे या संस्था लक्ष देतात. भारतात ग्रामीण भागात शेतकऱ्यांना व इतर घटकांना कमी व्याजाच्या दराने कर्ज मिळवून देण्यासाठी व त्यांना सावकाराच्या पाशातून मुक्त करण्यासाठी ग्रामीण स्तरावर प्राथमिक सहकारी संस्थांची आवश्यकता होती. 1904 मध्ये भारतात सहकारी कायदा संमत करण्यात आला. या कायद्यांतर्गत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कर्जविषयक गरजा भागवण्यासाठी प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन केल्या. या संस्था मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर कार्य करीत होत्या आणि त्यांच्याद्वारे मिळणारे कर्जाचे प्रमाण अत्यंत अल्प होते .1929 - 30 यामध्ये जागतिक मंदीचा प्रभाव या प्राथमिक संस्थावर पडला . त्यांच्याकडील थकबाकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले म्हणून सहकारी संस्थांनी कर्जाबरोबर शेतकऱ्यांना बी बियाणे, खते, औषधे, अवजारे इत्यादी वस्तूंचा पुरवठा केला.

• महत्त्वाचे शब्द (Keyword) :-

सहकार, सहकारी पतसंस्थासंस्था,शेतकरी,चळवळ, पतपुरवठा, व्यवस्थापन, इत्यादी.

• संशोधनाचे उद्देश :-

संशोधनासाठी खालील उद्देश निश्चित करण्यात आलेली आहेत. 1)सहकार चळवळीचा इतिहास पाहणे .

2)प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेचा अभ्यास करणे.

3) प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांची वैशिष्ट्ये स्पष्ट करणे. 4)प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेचे उद्दिष्टे स्पष्ट करणे.

5)प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थेची कार्य शोधणे

6)प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्या समस्या शोधणे.

7) उपाय योजना सुचविने

8) निष्कर्ष काढणे.

• संशोधनाची गृहीतके :-

सदर संशोधनाची वरील उद्देशानुसार खालील प्रमाणे गृहीतके निश्चित करण्यात आलेली आहेत .

1)ग्रामीण भागातील सावकाराच्या तावडीतून शेतकऱ्याची सुटका करण्यासाठी या संस्था शेतकऱ्यांना अल्प व्याज दराने व सुलभ अटींवर कर्ज पुरवठा करतात .

2)ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेती विकासासाठी कमी व्याज दराने कर्ज पुरवठा करण्यात येतो. 3)गावातील किमान दहा व्यक्ती एकत्र येऊन या संस्थेची स्थापना करतात.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

• संशोधन पद्धती :-

सदर संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर केलेला असून त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रातील अग्रलेख, इंटरनेट इत्यादीचा वापर करून वरील उद्दिष्टानुसार माहिती संकलित करून शोध प्रबंध तयार करण्यात आलेला आहे.

• प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था :-

प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था ही ग्रामीण भागात शेतकऱ्यांना व इतर घटकांना कमी व्याजाच्या दराने कर्ज मिळवून देण्यासाठी व त्यांना सावकाराच्या पाशातून मुक्त करण्यासाठी ग्रामीण सह स्तरावर ही संस्था कार्य करते. 1904 मध्ये भारतात सहकारी कायदा संमत करण्यात आला .या कायद्याचे अंतर्गत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कर्जविषयक गरजा भागविण्यासाठी प्रार्थमिक सहकारी पतसंस्था स्थापन केल्या. या संस्था मर्यादित स्वरूपाच्या तत्त्वावर कार्य करीत होत्या व त्यांच्याद्वारे मिळणारे कर्जाचे प्रमाण अत्यंत अल्प होते. 1929 -30 मध्ये जागतिक मंदीचा

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B
ISSN : 2278-9308 March 2024

प्रभाव या प्रार्थमिक संस्थावर पडला आणि त्यांच्याकडील थकबाकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले म्हणून सहकारी संस्थांनी कर्जाबरोबरच शेतकऱ्यांना बी बियाणे ,खते, औषधे, अवजारे इत्यादी वस्तूंचा पुरवठा केला. प्राथमिक संस्थांचे बहुउद्देशीय सहकारी संस्थांत रूपांतर केल्यानंतर या संस्थांना भांडवल व प्रशिक्षणाचे अडचणी व्यवसायात होत्या त्यामुळे 1954 मध्ये अखिल भारतीय पतपुरवठा पाहणी समितीने बहुउद्देशीय संस्था ऐवजी मोठ्या आकाराच्या संस्था स्थापन करण्याची शिफारस केली. या संस्थेचे कार्यक्षेत्र एखाद्या खेड्यापुरते मर्यादित न ठेवता ते अनेक खेड्यासाठी असावे असे समितीने सुचविले. तसेच प्रत्येक सोसायटीचे किमान भांडवल वीस हजार रुपये ठेवून सभासदांची संख्या 300 ते 500 पर्यंत ठेवण्याची शिफारस केली. भारतात कृषी सेवा सहकारी संस्थांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झालेला आहे.

• प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेची व्याख्या :-

1)" आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी परस्पर आणि सहकाराच्या तत्त्वावर ग्रामीण भागातील लोकांनी स्थापन केलेल्या संस्था म्हणजे प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था होय " श्रीयुक्त बी मुखर्जी यांच्या मते

2) "कृषी किंवा सेवा सहकारी पतपुरवठा संस्था म्हणजे जनतेच्या विविध गरजा भागविणारी एक विविध कार्यकारी सोसायटी आहे."

बलवंतराव मेहता समिती

• प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेची वैशिष्ट्ये :-

1) एखाद्या गावातील किमान दहा शेतकरी एकत्र येऊन या संस्थेची स्थापना करू शकतात .

2) कोणतेही सज्ञान व्यक्तीला या संस्थेचे सभासदत्व मिळविता येते.

3) प्रार्थमिक कृषी सहकारी संस्थेतील सभासदांच्या कमाल संख्येवर कोणतेही बंधन नाही .

4)या संस्थांची नोंदणी तालुका पातळीवरील सहाय्यक निबंधकाकडे केली जाते.

5) या संस्थेच्या नोंदणीसाठी नाममात्र शुल्क आकारले जाते .

6) एका गावात एक किंवा लोकसंख्या जास्त असल्यास एकापेक्षा जास्त संस्थांची स्थापना करता येते .

7) या संस्थेच्या सभासदांची जबाबदारी ही मर्यादित असते .

8) प्रार्थमिक सहकारी पतसंस्था कृषी किंवा बिगर कृषी स्वरूपाच्या असतात .

9) या संस्थेचे कार्यक्षेत्र एखादे गाव किंवा त्यांच्या जवळील काही गावे असू शकतात.

• प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांची उद्दिष्टे :-

1) ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची सावकाराच्या पाशातून मुक्ती करणे .

2) शेती विकासासाठी शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करणे .

3) ग्रामीण भागातील लोकांमध्ये बचतीची सवय वाढून बचतीला प्रोत्साहन देणे .

4) ग्रामीण भागातील लोकांच्या ठेवी स्वीकारणे आणि त्यांना कर्ज पुरवठा करणे .

5) शेतकरी किंवा सभासदांच्या कल्याणासाठी शैक्षणिक व सामाजिक कार्य करणे.

6) सभासदांच्या मालांची सहकारी पद्धतीने विक्री करून त्यांना मालांची योग्य किंमत मिळवून देणे .

7) शेतकऱ्यांना कर्जा बरोबरच बी बियाणे, खते ,औषधे, शेती सुधारणा, पीक कर्ज ,अवजारांची खरेदी इत्यादीसाठी आर्थिक मदत करणे .

8) सभासदांमध्ये सहकार व सहकार्याची भावना वाढीस लावणे.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

9) शेत मालाच्या वाहतुकीची व सहकार्याची भावना वाढीस लावणे .

10) ग्रामीण किंवा स्थानिक पातळीवर सहकारी चळवळ यशस्वी करणे .

11) ग्रामीण भागातील लोकांना बँकिंग सोयी उपलब्ध करून देणे .

12) संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण भागाचा आर्थिक विकास करणे.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचे व्यवस्थापन :-

कुटुंबातील वयाची 18 वर्षे पूर्ण केलेल्या एकाच गावातील किंवा परिसरातील लोकांना या संस्थेची स्थापना करता येते. या संस्थेचे कार्यक्षेत्र हे त्या खेड्यापुरते मर्यादित असते. प्रत्येक सभासद हा या संस्थेचा मालक असतो .प्राथमिक कृषी सहकारी

संस्थेचे कार्यक्षेत्र एखादे गाव किंवा गावाजवळील काही गावी असतात .गावातील किमान दहा व्यक्ती एकत्र येऊन या संस्थेची स्थापना करीत असतात. संस्थेच्या स्थापनेसाठी तिची सहाय्यक निबंधकाकडे नोंदणी करावी लागते .नोंदणी केलेल्या संस्थेला सर्व कायदेशीर अधिकार प्राप्त होतात संस्थेच्या स्थापनेनंतर तिचे पोट नियम तयार केले जातात. या पोटनियमात संस्थेचे व्यवस्थापन व प्रशासना संदर्भात नियम दिलेले असतात .संस्थेचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्यकारी मंडळ असते या कार्यकारी मंडळाची म्हणजे संचालक मंडळाची संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी निवड केली जाते. ही निवड एका वर्षासाठी केली जाते. कार्यकारी मंडळात कमीत कमी सात आणि जास्तीत जास्त 18 सभासद असतात. यापैकी एक मागासवर्गीय व एक दुर्बल घटकांचा प्रतिनिधी असला पाहिजे कार्यकारी मंडळात अध्यक्ष सचिव व खजिनदार इत्यादीचा समावेश केला जातो. कार्यकारी मंडळ संस्थेतील ध्येय धोरणाबाबतची निर्णय घेते व सचिव या निर्णयाची अंमलबजावणी करतो .

- प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांची कार्य :-

1) कर्जपुरवठा करणे :-

ग्रामीण भागातील सावकारांच्या तावडीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी या संस्था शेतकऱ्यांना अल्प व्याज दराने व सुलभातीवर कर्ज पुरवठा करतात. हा कर्ज पुरवठा अल्प व मध्यम मुदतीचा असतो. या संस्था शेतकऱ्यांना उपभोगासाठी ही कर्ज देत असतात. सहकारी सोसायटी यामुळे खेड्यातील जवळजवळ 70 ते 75 टक्के लोकांची सावकाराच्या जाळयातून सुटका झालेली आहे.

2) उत्पादक कार्यासाठी अर्थसहाय्य :-

प्राथमिक सहकारी पतसंस्था शेतकऱ्यांना शेती व उत्पादक कार्यासाठी पतपुरवठा करतात. भारतीय शेतकरी अज्ञानी, अंधश्रद्धाळू आहे .धार्मिक कार्य व रुढीपरंपराचा सांभाळ करण्यासाठी शेतकरी कर्ज घेतात परंतु शेतीतून पुरेशी उत्पन्न मिळाल्यामुळे कर्जाची परतफेड करू शकत नाही म्हणूनच प्रार्थमिक सहकारी पतसंस्था शेतकऱ्यांना केवळ उत्पादक कार्यासाठी कर्ज घेण्याबद्दल शेतकऱ्यांना काटकसर व बचतीची सवय लागते.

3) शेतीच्या अवजारांचा पुरवठा :-

शेतकऱ्यांना शेती व्यवसाय कार्यक्षमतेने करता यावा म्हणून त्याला अनेक लहान मोठे अवजारांची गरज असते. उदाहरणार्थ ट्रॅक्टर ,इलेक्ट्रिक पंप इत्यादी यंत्रे शेतकऱ्यांना एक रकम किंमत देऊन खरेदी करणे शक्य नसते परंतु ही अवजारे शेतीसाठी आवश्यक असतात. म्हणून संस्था शेतकऱ्यांना वरील प्रकारची अवजारे खरेदी करण्यासाठी कर्ज

पुरवठा करतात. लहान शेतकऱ्यांना वरील अवजारे खरेदी करणे शक्य नसते. त्यामुळे अनेकदा संस्था वरील प्रकारचे अवजारांची खरेदी करतात व लहान शेतकऱ्यांना ती भाड्याने देतात.

4) शेती उत्पादकतेत वाढ:-

शेतीचा विकास करण्यासाठी संस्था शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याबरोबरच शेतीसाठी उपयुक्त बी बियाणे ,खते, जंतुनाशके ,पशुखाद्य इत्यादीचाही पुरवठा करतात .शेतकऱ्यांना या संस्थेकडून वेळेवर कर्ज मिळत असल्यामुळे शेतीत योग्य सुधारणा करता येते. योग्य मशागत करता येते वरील सर्व बाबीमुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होते.

5) तांत्रिक मार्गदर्शन व सल्ला :-

ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग अज्ञानी असल्यामुळे त्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी तांत्रिक सल्ला व मार्गदर्शन करण्याचे नितांत गरज असते. शेतकऱ्यांना नवीन सुधारित बी बियाणे, खतांचे प्रमाण, जंतुनाशकांचा वापर, पाण्याचा वापर, हवामानातील बदलांचे पिकावर होणारे परिणाम व घ्यावयाची काळजी जमिनीची प्रत सुधारण्यासाठी करावयाचे प्रयत्न इत्यादी बाबीच्या संदर्भात या संस्थाकडून सल्ला व मार्गदर्शन केले जाते. त्याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होत असतो.

6) जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा :-

ग्रामीण भागात जनतेला अडचणीच्या वेळी जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा होणे अत्यंत आवश्यक आहे. पावसाळ्यात दुर्गम भागातील लोकांना जीवनावश्यक वस्तू मिळविणे अत्यंत कठीण जाते. दुर्गम भागात पावसाळ्यात रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट असते परंतु प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था उन्हाळ्यातच आपल्या गोदामात आवश्यक धान्य उपलब्ध करून ठेवतात त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला अन्नधान्य साखर ,मीठ इत्यादी सारख्या आवश्यक वस्तू वाजवी किमतीला मिळतात.

7) शेतमालाची विक्री :-

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विपणनाची समस्या अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे .ज्यावेळी शेतकऱ्याजवळ माल विक्रीसाठी उपलब्ध असतो त्यावेळेस त्याला योग्य भाव मिळत नाही. शेतमालाची योग्य ठिकाणी व योग्य वेळी विक्री करणे आवश्यक असते .संस्था विशिष्ट हंगामात शेतमालाची खरेदी करतात हा माल संस्थेच्या गोदामासाठीला जातो .ज्यावेळी मालाची किंमत वाढलेली असते त्यावेळेस तो विकला जातो .त्यामुळे शेतकऱ्यांना मालाची योग्य किंमत मिळून त्याचा फायदा होतो.

8) सहकारी प्रशिक्षण :-

प्राथमिक सहकारी संस्थांद्वारे सभासदांना परस्पर सहकार्य बचत करणे. शेतीची नवीन तंत्रे व पद्धती शेती अवजारे व यंत्रे वापरणे इत्यादी वापराचे प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय ग्रामीण जनतेला सहकाराचे महत्त्व पटवून देण्यासाठी उत्पादकता उद्योजकता इत्यादी ची माहिती देण्यासाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातात .

9) दुय्यम व्यवसायाला अर्थसहाय्य करणे :-

ग्रामीण भागातील शेतकरी शेतीला जोड धंदा म्हणून व्यवसाय करीत असतात. उदाहरणार्थ पशुपालन, कुक्कुटपालन, वराह पालन ,खत निर्मिती प्रक्रिया उद्योग इत्यादी या सर्व व्यवसायांना प्राथमिक सहकारी पतसंस्था कर्ज पुरवठा करत असतात. हे उद्योग शेतीला पूरक असल्यामुळे व त्यापासून उत्पन्न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थितीत सुधारणा होते.

10) गोदामाची सोय :-

Lata Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516

शेतकऱ्यांचा शेतमाल तयार झाल्यानंतर त्याला योग्य भाव मिळेपर्यंत साठविणे आवश्यक असते परंतु शेतकऱ्याजवळ माल साठविण्याच्या सोयी नसतात. त्यामुळे संस्था शेतकऱ्यांच माल साठविण्यासाठी गोदाम बांधण्यात कर्ज पुरवठा करतात. कधी कधी प्राथमिक सहकारी पतसंस्था स्वतः गोदाम बांधतात व त्याचा शेतकरी माल त्या गोदामात गोदाम भाडे देऊन संग्रहित करतात.

प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था च्या समस्या

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था पुढील समस्या पुढील प्रमाणे आहेत.

1) अपुऱ्या ठेवी :-

भारत हा खेड्यांचा देश आहे .ग्रामीण भागातील लोकांना बचतीची सवय लागावी म्हणून प्रार्थमिक सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात आल्या .ग्रामीण भागातील बचतीचा ठेवीकडे वळून बँका सक्षम होतील अशी अपेक्षा होती परंतु ठेवी मिळविण्यात या बँका अपयशी ठरलेल्या आहेत.

2) समतोल विकास :-

प्राथमिक सहकारी पतसंस्थांचा विकास हा सगळीकडे सारखा झालेला नाही.देशातील पश्चिम आणि दक्षिण भागातील प्राथमिक सहकारी पतसंस्था क्रियाशील आहेत .त्या तुलनेत पूर्व आणि उत्तरेकडील पतसंस्था कमकुवत आहेत .महाराष्ट्र ,तामिळनाडू ,पंजाव ,गुजरात या राज्यातील संस्थांनी शेती क्षेत्रात 53 टक्के कर्ज दिलेली आहेत .बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा या राज्यात संस्था कमी असून त्यांनी पंधरा टक्के पेक्षा कमी कर्ज पुरवठा शेती क्षेत्राला केलेला आहे.

**3) अक्षम संस्था :-**

प्राथमिक सहकारी पतसंस्था भागांची विक्री करून भाग भांडवल मिळवितात परंतु त्यांच्या अकार्यक्षम कारभारामुळे त्या ग्राहकांचा विश्वास संपादन करू शकले नाही त्यामुळे त्यांना अपेक्षित भांडवल मिळालेली नाही .त्या सक्षम व बलवान होऊ शकलेल्या नाहीत .त्यांची सभासद संख्या कमी असून भांडवल अपुरे आहे.त्यामुळे शेती क्षेत्राच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यात त्या अपयशी ठरलेल्या आहेत.

4) सदोष कर्ज विषयक धोरण :-

प्राथमिक सहकारी कृषी पतसंस्था यांचे कर्ज विषयक धोरण हे सुद्धा आहे .त्या कर्ज वाटप आणि कर्ज वसुली वेळेवर करीत नाहीत .जे कर्ज दिले जाते ते गरजूंना देण्यापेक्षा सदन शेतकऱ्यांना दिले जाते.कर्जही एकदम एका हप्त्यात दिले जाते.परंतु कर्जाची वाटप हप्त्याने व काही प्रमाणात वस्तूच्या स्वरूपात होणे आवश्यक आहे .पिकाच्या तारणावर या संस्था अजूनही कर्ज पुरवठा करीत नाहीत.

5) व्याजदर वाढते असतात:-

प्राथमिक सहकारी पतसंस्था यांच्या कर्जावरील व्याजाचे दर जास्त असतात.त्यांचे स्वतःचे भांडवल अपुरे असल्यामुळे त्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांना द्यावे लागते .ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्ज पुरवठा होणे आवश्यक आहे पण या क्षेत्रात ही संस्था अपयशी ठरलेल्या आहेत.

6) कर्ज वाटपात विलंब वसुलीत अपयश :-

प्राथमिक सहकारी पतसंस्थांची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नसल्यामुळे व अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज मिळत नाही.कर्ज देताना दिरंगाई, विलंब होतो त्यामुळे शेतकऱ्यांना गरजेचे वेळी कर्ज मिळत नाही .तसेच या बँकांच्या कर्जाची वसुली वेळेवर होत नाही.

7) फक्त उत्पादक कर्जाचे वाटप होते :-

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

प्राथमिक सहकारी पतसंस्था या प्रामुख्याने उत्पादक स्वरूपाच्या कार्यास कर्जपुरवठा करीत असतात .त्या उपभोगासाठी कर्ज देत नाही त्यामुळे ग्रामीण शेतकऱ्यांना सावकाराकडून उपभोग्य गरजा पूर्ण करण्यासाठी कर्ज घ्यावे लागते.त्यामुळे शेतकऱ्यांची सावकाराच्या तावडीतून सुटका होत नाही.

8) राजकीय हस्तक्षेप :-

राजकीय हस्तक्षेपामुळे अनेक ठिकाणी प्राथमिक सहकारी पतसंस्था या राजकारणाचे अड्डे बनलेले आहे .ग्रामीण भागातील लोकांचे हितसंबंध जपल्या जात आहेत त्यामुळे या संस्थांची व्यवस्थापन कार्यक्षमपणे व व्यवस्थित होत नाही.

9) अपुरे नियंत्रण :-

प्राथमिक सहकारी पतसंस्थावर सरकारचे आणि जिल्हा सहकारी बँकांचे नियंत्रण हे अपुरे असते.शेतकरी मिळालेल्या कर्जाचा वापर कशाप्रकारे करतो याकडे लक्ष दिल्या जात नाही.बऱ्याच वेळा कर्जाचा वापर अनुत्पादक कार्यासाठी केला जातो.त्यामुळे संस्था व कर्जदार अडचणीत येतात.संस्थेवरील नियंत्रणा सातत्य नसल्यामुळे वसुलीत अडचणी निर्माण होतात.

10) लहान शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष :-

भारतातील सहकारी पतसंस्था चा मुख्य हेतू लहान शेतकऱ्यांचा विकास घडवून आणणे हा असतो .लहान शेतकरी दुर्बल असल्यामुळे त्याच्याकडे स्वतःचे भांडवल नसते.अशा दुर्बल सभासदांना मदत करणे .हा हेतू असताना देखील प्राथमिक सहकारी पतसंस्था मोठ्या शेतकऱ्यांनाच आर्थिक मदत करताना दिसून येतात.

उपाययोजना :-

वरील प्रकारच्या समस्या प्रार्थमिक सहकारी पतसंस्थेच्या कार्यपद्धतीत असली तरी काही उपाययोजना केल्यास निश्चितच या समस्यांची तीव्रता कमी होण्यास मदत होईल.

1) सभासद आणि बिगर सभासदाकडून मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा करणे.
2) प्रशिक्षित अनुभवी व्यवस्थापक व नोकरवर्गाची नेमणूक करणे .
3) शेतकऱ्यांना त्यांच्या गरजे इतका कर्ज पुरवठा करणे
4) शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज पुरवठा करणे .
5) शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जाची नाठ्यखोरपणे वसुली करणे .
6) लहानात लहान शेतकऱ्यांनाही आर्थिक मदत करणे .
7) प्राथमिक सहकारी पतसंस्थेचे हिशोबाची तपासणी योग्य व्यक्तीकडून करणे .
8) प्राथमिक सहकारी पतसंस्था आणि विपणन संस्था यांच्यात योग्य समन्वय साधने.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1) डॉ.एस के ढगे व इतर, भारतातील बँक व्यवसाय आणि सहकार के एस पब्लिकेशन पुणे
2) डॉ.माधव बिरादार, सहकार विद्या बुक्स पब्लिशेअर्स औरंगपुरा औरंगाबाद
3) मोहन सराफ व इतर, सहकार मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे
4) डॉ.बी डी इंगळे, सहकार अरुणा प्रकाशन लातूर.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani